# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय परभणी
## (गृह विभाग)

Email- rdcparbhani@gmail.com Phone No.-02452-223702

DISTRICT MAGISTRATE PARBHANI सत्यमेव जयते

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक-2015**

क्रमांक.2015/अ-1/पोल/कावि-405 दिनांक : /07/2015

1 AUG 2015

**विषयः- मतदान दिनांक.04 ऑगस्ट, 2015 (मंगळवार) रोजी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्र परिसरात फौजदारी प्रक्रीया संहिता, 1973 चे कलम 144 लागु करणे बाबत**

## आ दे श

ज्याअर्थी मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक.23/06/2015 रोजी सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूक 2015 कार्यक्रम घोषीत केला असुन कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासुन आदर्श आचार संहीता अंमलात आलेली आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील संबंधीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक तसेच रिक्त पदांच्या पोट निवडणूकांची संपुर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन आणि कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी ज्या ठिकाणी मतदान होणार आहे त्या ठिकाणापासुन 200 मिटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व ईतर ईलेक्ट्रॉनिक उपकरणे, निवडणूकीच्या कामाव्यतिरीक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे/उमेदवारांचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूक कामाव्यतिरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्याकरीता दिनांक.04 ऑगस्ट, 2015 (मंगळवार) रोजी प्रतिबंध करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे आणि ज्याअर्थी सर्व संबंधीतांना नोटीस देवुन त्यांचे म्हणने ऐकुन घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

2. त्याअर्थी मी राहुल रंजन महिवाल, जिल्हादंडाधिकारी परभणी फौजदारी प्रक्रीया संहीता 1973 चे कलम 144 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन असे आदेश देत आहे की, निवडणूक कालावधीत परभणी जिल्हयातील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी दिनांक.04 ऑगस्ट, 2015 (मंगळवार) रोजी ज्या ठिकाणी मतदार होणार आहे त्या ठिकाणापासुन 200 मिटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर ईलेक्ट्रॉनिक उपकरणे, निवडणूकीच्या कामाव्यतिरीक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे/उमेदवारांचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूक कामाव्यतिरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

हा आदेश परभणी जिल्हयातील संबंधीत ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक 2015 च्या मतदानाच्या दिवशी दि.4 ऑगस्ट, 2015 (मंगळवार) रोजी सर्व मतदान केंद्रावर मतदान सुरु झाल्यापासुन संपूर्ण मतदान प्रक्रीया संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरील आदेश आज दिनांक.01 /08/2015 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

स्वाक्षरीत/-

**(राहुल रंजन महिवाल)**
**जिल्हादंडाधिकारी, परभणी**

**प्रतिलीपी माहीतीस्तव सादर**

1) मा. मुख्य निवडणूक अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई
2) मा. मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई
3) मा. निवडणूक निरीक्षक, सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूक विभाग, परभणी/सेलू/गंगाखेड/पाथरी

**प्रतिलीपी, आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

1) पोलीस अधिक्षक परभणी यांना आपले अधिनस्त पोलीस यंत्रणेच्या निदर्शणास आणूण देऊन काटेकोर अंमलबजावणीस्तव.
2) निवासी उपजिल्हाधिकारी तथा तथा नोडल ऑफीसर, आदर्श आचारसंहीता अंमलबजावणी व नियंत्रण कक्ष परभणी
3) उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
4) उप विभागीय दंडाधिकारी, परभणी/सेलू/गंगाखेड/पाथरी
5) उपविभागीय पोलीस अधिकारी (सर्व) जिल्हा परभणी (जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मार्फत)
6) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, परभणी/पूर्णा/पालम/गंगाखेड/सोनपेठ/पाथरी/मानवत/सेलू/जिंतूर
7) पोलीस निरीक्षक (सर्व), पोलीस स्टेशन, जिल्हा परभणी (जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मार्फत)
8) एनआयसी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना निवडणूक संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्द करण्यास्तव दिली जाते.
9) जिल्हा माहिती अधिकारी, परभणी यांना देवून सूचित करण्यात येते की, वरील आदेश वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करावे.
10) केंद्र अभियंता, आकाशवाणी केंद्र परभणी यांना तात्काळ प्रसारणास्तव.
11) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, त्यांनी शासकीय आदेशात वरील आदेशाची प्रसिद्धी करुन राजपत्राच्या पाच प्रती या कार्यालयास पाठविण्यास्तव दिली जाते.

**जिल्हादंडाधिकारी, परभणी**